# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **'पिपल्स डिप क्लीन ड्राईव' या स्वच्छता मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांचे शहरवासियांना आवाहन**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. ०९ मार्च २०२४ रोजी ' पिपल्स डिप क्लीन ड्राईव या अभियानाचे आयोजन मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. ही मोहीम शहरातील ६ ठिकाणी होणार असुन मॅक्सस मॉल ते गोल्डन नेस्ट ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते ९० फीट रोड (भाईंदर (प.)) ते गोल्डन नेस्ट ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, नवघर नका ते विमल डेरी ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती कार्यालय ०४ ते पाण्याची टाकी ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती कार्यालय ०५ ते पय्याडे हॉटेल ते दीपक हॉस्पिटल ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान आणि एस. के. स्टोन मैदान ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान या मुख्य सहा मार्गांवर सकाळी ठीक ०७ वाजता सुरु होणार आहे.

महिला सक्षमीकरणाच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत उपक्रम मिरा-भाईंदर महानगरपालिका राबवत असून 'सन्मान स्त्रित्वाचा' ही मध्यवर्ती संकल्पना केंद्रस्थानी ठेवून स्वच्छतेला प्रोत्साहन आणि शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी ‘पीपल्स डिप क्लीन ड्राईव्ह चे आयोजन केलेले आहे. रस्ते आणि पदपथावरील धूळ कमी करणे व मलनि:सारण केंद्रातील पाण्याचा पुर्णवापर हे ह्या मोहिमेचे लक्ष्य आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान येथे सकाळी ९ वाजता या मोहिमेचा समारोप होणार असुन समारोपाप्रसंगी स्वच्छतेची शपथ घेण्यात येणार आहे. जेणेकरून शहरातील नागरिक शहर स्वच्छ राखण्यात कटीबद्ध राहतील. मिरा भाईंदर महानगरपालिका द्वारे आयोजित 'पिपल्स डिप क्लीन ड्राईव्हा मध्ये सर्व नागरिक, संस्था, व्यापारी, महिला, युवक, शिक्षक वर्ग आणि समाजातील सर्व घटकांनी या मोहिमेत उत्साहाने सहभाग नोंदवून शहर स्वच्छतेच्या कार्यात प्रत्यक्ष हातभार लावण्याचे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.